## आंतरराष्ट्रीय योग दिनाचा अहवाल २०१७ - २०१८

संस्कार मंदिर संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि.२१/०६/२०१७ रोजी ८.३० ते ११.00 यावेळेत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.

डॉ.देवेंद्र भावे मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांनीच नव्हे तर प्रत्येकाने योगाभ्यास केला पाहीजे असे विचार मांडले. योगदिनानिमित्त महाविद्यालयातील ग्रंथपाल यांनी "योगाचे आपल्या जीवनातील महत्त्व" या विषयावर व्याख्यान देत योगाची प्रात्यक्षिक करून दाखविली व विद्यार्थ्यांकडूनही करवून घेतली. योगासनांमुळे आजारांवर कसे नियंत्रण मिळविता येते हे त्यांनी यातून सांगितले. तसेच सुखासन, प्राणायाम, कपालभाती, सूर्यनमस्कार या सर्व आसनांमुळे आपण आपले आरोग्य कसे निरोगी ठेवू शकतो हे विद्यार्थ्यांना समजून सांगितले. याचा विद्यार्थ्यांना नक्कीच फायदा होईल असे दिसून आले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी प्रांजली विद्यासागर यांनी केले. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.संतोष शिंदे तर आभार प्रदर्शन प्रा.संजय गिरी यांनी केले. सदर कार्यक्रमास डॉ.देवेंद्र भावे उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचा सदर कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद होता.

कला व वाणिज्य महाविद्यालय, वारजे-माळवाडी, पुणे-५८
आयडी क्र. PU/PN/ACI 149/2000 19/9/2000

PRINCIPAL
Arts & Commerce College
Warje-Malwadi, Pune-58

POCO
SHOT ON POCO M2